Open Access

# उदयगिरी - बहुभाषिक इतिहास संशोधन पत्रिका

(A Bimonthly, Refereed, & Peer Reviewed Journal of History)
Published by: AAASSHER, Mumbai, (MS) India
Journal homepage: https://udayagiri.aaassher.org/
ISSN (Online): 2583-8423
Volume 1, Issue 4, October 2023; Pages 684 – 686
DOI: 10.5281/zenodo.10279206

**Original Research Article**

## धर्म आणि परमेश्वर : महात्मा गांधी

प्रा. मनोज आर. पवार

कर्मयोगी तुळशीराम पवार महाविद्यालय हाडोळती ता. अहमद्पुर जिल्हा: लातूर ४१३५१४ महाराष्ट्र, भारत

*Corresponding author E-mail*: pawarmanoj906@gmail.com

Received: 13 October, 2023 | Accepted: 26 October, 2023 | Published: 28 October, 2023

गांधी यांच्या विचारसरणीचा मुख्य आधार म्हणजे धर्म होय ते लहानपणा पासून धार्मिक वर्तीचे होते. त्यांच्या मनात धार्मिक संस्कार खोलवर रुजलेले होते. म्हणून धर्मासंबंधीचा विचार हा व्यापक आणि मानवतावादी होता. त्यांना कोणताही सांप्रदायिक दृष्टिकोन नव्हता मानवी जीवनातील सर्व कृतींना ईश्वराचे अधिष्ठान असले पाहिजे असे म्हणत होते परंतु त्याने पुढे असेही म्हटले आहे की म्हणजे केवळ ईश्वराची उपासना आणि धार्मिक कर्मकांडाविषयी ला विरोध होता डीजी कोठेही धार्मिक वृत्तीचे मानणारे असले तरी व्यक्तिगत जीवनात कोणत्याही विधी किंवा करत नसत ही गोष्ट लक्षात घेण्यायोग्य आहे तेव्हा पुढे असे म्हणतात.

नैतिक कर्तव्याचे पालन म्हणजे धर्माचरण होय. धर्माबद्दलची आपली कल्पना स्पष्ट करताना ते म्हणतात की धर्म हा आपल्या प्रत्येक कार्यात व्यापून असला पाहिजे धर्माचा अर्थ एखाद्या कट्टर संप्रदाय असे नाही तर. विश्वाच्या नैतिक सुव्यवस्थेवर श्रद्धा असा त्याचा अर्थ स्पष्ट होतो. हिंदू मुस्लिम ख्रिश्चन अशा सर्व पलीकडच्या असा धर्म आहे. हा धर्म इतर कोणत्याही धर्माचा उच्छेद करत नाही समन्वय साधवीतो व त्यांना वास्तव बनवितो धर्मासंबंधीच्या या दृष्टिकोनातून त्यांच्या सर्वधर्मसमभाव या संकल्पनेचा उदय झाला महात्मा गांधीजी असे म्हणतात की हिंदू मुस्लिम ख्रिश्चन आधी विविध संप्रदाय म्हणजे एकाच ध्येयात जाणारे विविध मार्ग होय. ज्याप्रमाणे वृक्षाला वेगवेगळ्या शाखा असतात पण त्याची मूळ मात्र एकच असते त्याचप्रमाणे मूळ धर्म एक असून माणसाने निर्माण केलेले वेगवेगळे पंथ आहेत. गांधीजी असे म्हणतात की चित्राहून त्यांना असे निर्णय आढळून आले आहे की, सर्वधर्म खरी आहेत आणि प्रत्येक धर्मात चुका आहेत व धर्म खरे आहेत त्यांचा गांधीजींना प्रेत असणारा अर्थ असा आहे की सर्व धर्मातील मूलतत्वे एकसारखीच आहेत आणि त्या खरी आहेत आणि त्यामध्ये निर्माण झालेली रुढी या चुकीच्या आहेत. मा गांधी ने धर्म म्हणजे राजकारण मानले नाहीत

त्याचे राजकारण हे समाजाबद्दलच्या कर्तव्याने भावनेने केलेले कार्य होय समाजातील माणसाचे जीवन राजकारणाच्या विषारी जिवाणू ने वेढलेले असून दोन माणसाला सोडवावयाचे असेल तर त्याला धार्मिक जोड दिल्याशिवाय गत्यांतर नाही. राजकारणापासून धर्माला बाजूला तेव्हा समाज जीवन विनाशाच्या दिशेने वाटचाल करू लागेल धर्मापासून राजकारणाला जेव्हा आपण तोडतो तेव्हा धर्माचे कार्य पालन अमान्य करीत असतो. जेव्हा आपण तुच्छ नजरेने पाहतो तेव्हा त्याचा घाणेरडा खेळामधून त्याची हटाळणी करतो तेव्हा आपण जातीविरहित राजकारणाची कल्पना करतो. म्हणून गांधीजी म्हणतात की राजकारण अर्थकारण शिक्षण ही सर्व धार्मिक प्रभावापासून अलग नसावीत धर्मापासून राजकारणाला करणे म्हणजे समाजाच्याही अंधपथनाच्या मार्गाने ने ने होय. यासंदर्भात प्रश्न असा निर्माण होतो की राजकीय सामाजिक जीवनाला निश्चित कोणत्या धर्माचे अधिष्ठान असावे? गांधीजी याबद्दल धारणा काय असावे ? भारतात इस्लाम ख्रिश्चन हिंदू इत्यादी अनेक धर्म आहेत परंतु समाज जीवनाला यापैकी कोणत्याही धर्माचा आधार असता कामा नये तेव्हा सर्व धर्मांना व्यापणारा व त्या पलीकडे जाणारा म्हणजे विश्वधर्म गांधीजींनी स्पष्ट केले आहे

१. वैश्विक धर्म. ज्या धर्मामध्ये हिंदू मुस्लिम ख्रिश्चन अशा सर्व धार्मिक संप्रदायाच्या पलीकडे असणारा धर्म म्हणजे वैश्विक धर्म होय हा सर्व धर्माचा आधार आहे धर्म म्हणजे सर्व धर्मात समान असणारी व मानवतेची शिकवण देणारी सत्य अहिंसा दया क्षमा शांती ही तत्वे आहेत ही तत्त्वे म्हणजे माणसाचा खरा धर्म आहे धर्म त्यांच्या हा लक्षात घेऊन तर राजकारण आणि आपला धर्म फारकत करण्याची गरज नाही उलट अशा मानवतावादी धर्मामुळे राजकारणाचे स्वरूप नैतिक आणि शुद्ध बनेल आणि राजकारण हे वेगवेगळया धार्मिक संप्रदायाच्या संघर्षाचे क्षेत्र न बनता हा विशुद्ध मानवतावादी धर्म सर्व धर्माचे ऐक्य ते साध्य करू शकतो.
२. धर्माची कल्पना. धर्माची कल्पना मान्य केली तर असा निष्कर्ष निघतो की सर्व धर्म समान आहेत कारण सर्व धर्मातील मूलतत्वे सारखीच आहेत तसेच सर्व धर्म हे नेहमी सत्यच सांगतात कारण त्याचा उदय दैवी प्रेरणेने झालेला असतो धर्म ही केव्हाही दैवी सत्यचा अविष्कार करतो. आणि तेही माणसाचे साध्य होऊन तसेच मनुष्यावर कशाचीच बंधने नसतात म्हणून त्याला पूर्ण सत्याचे आकलन होत नाही अशाप्रकारे धर्म खरे आहेत कि त्यामध्ये काही चुका आहेत म्हणून माणसाला कोणताही धर्म या धर्मावरून श्रेष्ठ किंवा कनिष्ठ नाही याच कारणामुळे गांधीजींनी समांतराच्या कल्पनेला विरोध केला आहे त्यांच्या मते चांगल्या धर्माचरणासाठी धर्मांतराची जरुरी नाही तर अनेक आपल्या धर्माचे पालन अधिक योग्य प्रकारे करण्याची जरुरी आहे हिंदू माणूस इस्लाम किंवा ख्रिस्ती धर्मापासून हिंदू धर्मातून अधिक चांगली प्रेरणा घेऊ शकतो तेव्हा हिंदूंनी ख्रिस्ती अधिक चांगले बनावे त्यासाठी त्या मानवाने अति प्रयत्न केले पाहिजे. तसेच प्रत्येकाने इतर धर्माचा अभ्यास किंवा तत्त्वाचा अभ्यास करून त्या तत्त्वाविषयी त्यांच्या मनात आदराची भावना असली पाहिजे. त्या धर्माविषयी प्रेम आपुलकी जिव्हाळा निर्माण केला पाहिजे.
३. धर्म एक संप्रदाय नाही. धर्म एक संप्रदाय नाही किंवा ही नाही कारण ही विश्वाच्या नैतिक सुव्यवस्थेवर श्रद्धा म्हणजे धर्म होय आणि नैतिक कर्तव्याचे पालन करणे म्हणजे धर्माचरण होय. जेव्हा एखादा धार्मिक संप्रदाय

आपला नैतिक आधार गमावतो तेव्हा त्याचे अध्यपतन होते तो विशुद्ध आणि धर्म राहत नाही त्या उलट नैतिक आधारावर किंवा पायावर आधारलेला धर्म माणसाला विशुद्ध बनवितो आणि त्याला इतर विश्वाची च्या एकरुपतेची जाणीव करून देतो.

४. धर्माला मानवी जीवनात चीरस्थायी स्थान: गांधीजीच्या मते धर्माला चिरस्थायी स्थान आहे. कारण धर्म त्याग करून माणूस जगू शकत नाही विश्वातल्या त्याही धर्माशी मानवाचा संबंध असला पाहिजे अगदी निरीईश्वरवादी माणसाचा सुद्धा स्वतःचा धर्म असतो कारण तो सुद्धा काही नैतिक तत्त्वावर विश्वास ठेवत असतो या नैतिक तत्वामुळे समाजात सुसंवाद राहतो आणि सामाजिक गुणाचा विकास होतो व त्याचे पालन केल्यास त्याचा समाजावर विपरीत परिणाम होतो.

५. प्रत्येक मानव हे ईश्वराची मुले आहेत. प्रत्येक धर्मातील मनुष्य हे ईश्वराची मुले आहेत त्यांच्यामध्ये काही ना काही ईश्वराचा अंश असतो मग तो ख्रिस्ती धर्माचा असो लांब हिंदू धर्माचा असो सर्वांमध्ये व मानवामध्ये ईश्वराचा अंश असतो असे समजून सहकार्य केले पाहिजे ईश्वराची लेकरे आहेत म्हणून त्याची सेवा करणे म्हणून खरा मानव धर्म होय यालाच ईश्वर धर्म म्हणता येईल माणसाने स्वर्गाचा त्याग करून विशाल दृष्टिकोनाचा स्वीकार केला पाहिजे तेव्हा विश्वधर्म या गोष्टीची शिकवण होते म्हणून शोषित पीडित गांजलेले त्याची सेवा करणे म्हणजेच खरा धर्म होय. उदाहरणार्थ तुकाराम महाराजांनी असे म्हटले आहे की, जे का रंजले गांजले त्याशी म्हणावे आपुले! असे आपल्या अभंगातून इतरांना ते उपदेश करतात.

६. व्यक्तीच्या मनात निर्भय असणे आवश्यक. व्यक्ती ती हा कोणत्या का धर्माचा असेना चला पाहिजे म्हणजे तो व्यक्ती धर्मावर किंवा देवावर श्रद्धा ठेवणारा निर्भय असावा त्या व्यक्तीची सत्य आणि न्याय यावर महत्त्वाची सत्ता असणे आवश्यक आहे त्याचा निर्भयपणे पालन करणे ही महत्त्वाची तो व्यक्ती कोणत्याही संताच्या व्यक्तीकडे पाहिले तर या गोष्टीची प्रचिती ही आपणास येऊ शकते शुद्ध वर्तन शुद्ध मन इत्यादी चांगुलपणातून ईश्वराचे अस्तित्वच साकार होत असते म्हणून प्रत्येक व्यक्ती निर्भय असेल तर सर्व गोष्टी घडत असतात.

**संदर्भ सूची**

१. दा. दो. काचोळे भारतीय सामाजिक विचारवंत

२. आर भोळे सामाजिक विचारवंत

३. पि.के. कुलकर्णी. भारतीय सामाजिक विचारवंत